# बृहन्मुंबई महानगरपालिका

**माहितीपत्र**

क्र.प्रले/पापुमनि/अर्थसंकल्प/नप्र/ १३८ दि. २.६.२०२३

विषय: अर्थसंकल्पीय अंदाज 'ग' (निधी संकेतांक : ४०) चे सन २०२२-२०२३ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज तसेच सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पीय अंदाजाची प्रशासक (महानगरपालिका) स्तरावरील स्वीकृती.

संदर्भ : प्रशासक (स्थायी समिती) यांनी दि.२८.०२.२०२३ रोजीच्या ठराव क्र.१९३७ अन्वये दिलेली मंजुरी.

.........

अद्ययावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १२६ ई (सुधारित) अन्वये प्रशासक (स्थायी समिति) यांना सादर करण्यात आलेल्या सन २०२२-२०२३ च्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजांना आणि सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांना कोणतेही बदल न करता प्रशासक (स्थायी समिति) यांनी त्यांच्या दि.२८.०२.२०२३ रोजीच्या ठराव क्र.१९३७ अन्वये मंजुरी दिलेली होती. त्यानुसार अद्ययावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम ६क (१) सह वाचावयाच्या कलम १२६ फ (३) अन्वये प्रशासक (स्थायी समिति) यांनी मंजूर केलेले सन २०२२-२०२३ चे सुधारित तसेच सन २०२३-२०२४ चे उत्पन्नाचे व खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज 'ग' प्रशासक (महानगरपालिका) यांस स्वीकृतीकरीता सादर करण्यात आलेले होते.

२. वरील प्रमाणे प्रशासक (स्थायी समिती) यांनी सादर केलेले सन २०२२-२०२३ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज तसेच सन २०२३-२०२४ चे अर्थसंकल्पीय अंदाज 'ग', अद्ययावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ६क (१) अन्वये प्रशासकांस प्राप्त झालेल्या अधिकारानुसार **प्रशासक (महानगरपालिका) यांनी त्यात कोणतेही बदल न करता** उत्पन्नाची बाजू दि.२०.०३.२०२३ रोजी व खर्चाची बाजू दि.२९.०३.२०२३ रोजी स्वीकृत केलेली आहे.

३. प्रशासक (स्थायी समिती) यांना सादर करण्यात आलेले सन २०२२-२०२३ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज तसेच सन २०२३-२०२४ वर्षाच्या अर्थसंकल्प 'ग' च्या अर्थसंकल्पीय अंदाजाच्या संगणकीय प्रती सर्व खाते/विभागीय प्रमुखांना ह्या खात्यातर्फे यापूर्वीच वितरीत करण्यात आलेल्या आहेत.

४. सर्व खाते/विभागीय प्रमुखांनी कृपया याची नोंद घ्यावी.

सही/-०४.०५.२०२३

**(पांडुरंग वि. गोसावी)**

**प्रमुख लेखापाल (पा.पु.म.नि.)**

---

क्र.प्रले/पापुमनि/अर्थसंकल्प/नप्र/ १३८ दि.०२.०६.२०२३

माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

प्रघाडी 02/06/2023

**(प्रदिप र. घाडी)**

**प्रमुख लेखापाल (पा.पु.म.नि.) यांजकरिता**